# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

माहितीचा अधिकार

## क्र. मुमाआ/नों.क्र.८३६१/२१/अ.क्र.४८३/२४

श्री.यशवंत कदम

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि-१,२)
एच/पूर्व विभाग, सहाय्यक आयुक्त एच/पू. विभाग यांचे कार्यालय,
प्लॉट क्र.१३७. टी.पी.एस.दुसरा रोड, प्रभात कॉलनी,
सांताक्रुझ (पू.) मुंबई-४०० ०५५.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, एच/पूर्व (परि-२)
सहाय्यक आयुक्त एच/पू. विभाग यांचे कार्यालय,
प्लॉट क्र.१३७, टी.पी.एस.दुसरा रोड, प्रभात कॉलनी,
सांताक्रुझ (पू.) मुंबई-४०० ०५५.

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २९.०२.२०२४**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०८-१२-२०२० | १५-१२-२०२० | ०५-०२-२०२१ | ०६-०४-२०२१ |

अपिलकर्ता यांनी आयोगाकडे दि.२६-०७-२०२१ नुसार जन माहिती अधिकारींनी माहिती दिली नाही असे कारण नमूद करुन व्दितीय अपिल दाखल केले आहे.

अपिलकर्तांनी माहिती अर्ज दि.०८-१२-२०२० नुसार प्रभाग क्र.९४ अंतर्गत करण्यात आलेल्या ई-कोटेशन कामांची माहितीची मागणी केलेली आहे.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि-२) एच/पूर्व श्री.ऋषिकेश पवार यांनी निरीक्षणाची वेळ देवून आवश्यक असलेल्या माहितीचे विहीत शुल्क भरल्यानंतर माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे उत्तर दिले.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता एच/पूर्व श्री.सुनिल बेंद्रे यांनी अपिलकर्तांनी जन माहिती अधिकारींच्या कार्यालयात निरीक्षणसाठी उपस्थित राहून कार्यालयात उपलब्ध असलेल्या

अभिलेखाचे निरीक्षण करावे व आवश्यक असलेल्या माहितीचे शुल्क भरावे. जन माहिती अधिकारींनी अपिलकर्तांनी विहीत शुल्क भरल्यानंतर माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी असे आदेश पारित केले.

आजच्या सुनावणीच्या वेळी अपिलकर्ता उपस्थित. जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

सुनावणीच्या वेळी अपिलकर्तांनी विशद केले की, अगोदर निरीक्षण केले परंतु निरीक्षणानंतर माहिती मिळाली नाही.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

१. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८)०१ (क) (२) नुसार कार्यकारी अभियंता एच/पूर्व यांना या प्रकरणी जन माहिती अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांना आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने जोडपत्र "अ" मध्ये मागणी केलेली माहिती आयोगाचे आदेश प्राप्तीच्या ३० दिवसात अपिलार्थीस व्यक्तीशः विनामूल्य द्यावी. तसेच जी माहिती उपलब्ध होत नाही किंवा देता येत नाही त्याबाबतचे स्पष्ट कारण नमूद करुन अपिलार्थीस लेखी कळवावे.
२. तत्कालिन जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता स्थापत्य यांनी प्रथम अपिल आदेशाची अंमलबजावणी केली नाही, त्यामुळे अधिनियमाच्या कलम ७ (१) चा भंग केलेला असल्याने त्यांचे विरूध्द अधिनियमाच्या कलम २० (१) नुसार कारवाई का करणेत येवू नये? या बाबतचा खुलासा आदेश प्राप्ती पासून एक महिन्याच्या आत आयोगास सादर करावा, अन्यथा आयोगाच्या आदेशाच्या उल्लंघनाची कृती दंडात्मक कारवाईस पात्र ठरेल.
३. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार या प्रकरणी विद्यमान जन माहिती अधिकारी तसेच विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता किंवा पूर्व परवानगी न घेता द्वितीय अपील सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने कारवाई करावी.
४. अपिल निकाली काढण्यात येत आहे.

State Information Commission Maharashtra

(समीर सहाय)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २९-०२-२०२४

प्रत- आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई माहिती व आवश्यक कार्यवाही करिता